Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

# जालना शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षक व पालक यांच्यातील संबंधाचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होणारा परिणाम एक अभ्यास

प्रा.नामदेव रामभाऊ‍ मेहेत्रे

*जिजामाता महिला अध्यापक महाविद्यालय,*
*सिंदखेड राजा, जिल्हा बुलढाणा.*

- **प्रस्तावना**

शाळा हे एक समाजाचे छोटेसे स्वरुप आहे. समाजातील भिन्न प्रवृत्तीचे प्रतिबींब या छोटया समाजात असते. समाजामध्ये अनेक लोक विविध स्तरातून एकत्र आलेले असले तरी देखील त्यांच्यात परस्पर संबंध असतात. हे संबंध सहकार्याचे असतील तर त्याचा लाभ दोन्ही घटकांना होतो. त्याच प्रमाणे शाळेतही भिन्न प्रवृत्तीच्या अनेक व्यक्ति राहात असतात. त्याच्यातही परस्पर सहकार्य असेल तर त्या सर्वांचा परिणाम विद्यार्थी गुणवत्तेवर होतो.

सर्वसाधारणपणे शिक्षणाचा हेतू व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करणे हा आहे. या विकासात शारीरिक स्वास्थ माणसिक सतर्कता, नैतिक उत्कृष्टता आणि समायोजन इत्यादी बाबीचा समावेश होतो. यातिल ब–याचशा गोष्टी विद्यार्थी फक्त बघून किंवा अनुभवातुन शिकतो तर काही घटक त्याला अध्ययनातून शिकावे लागतात. म्हणजे विद्यार्थ्याच्या शिक्षणावर अनैपचारिक व औपचारीक घटकांमध्ये कुटूंब, पालक मित्र, परिवाार यांचा समावेश होतो. तर औपचारीक मध्ये शिक्षक, शाळा यांचा उल्लेख करता येईल या दोन्ही मध्ये योग्य समन्वय साधल्यास याचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर सकारात्मक परिणाम दिसून येईल.

Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

विद्यार्थ्यांस शिक्षण देण्याचे कार्य शाळा म्हणजेच शिक्षक करीत असतात. तर शाळेबाहेर विद्यार्थी विविध गोष्टी त्याच्या कुटूंबातून म्हणजेच पालकांकडून शिकत असतो. प्राचिण काळापासून भारतात विविध शिक्षण प्रणाली कार्यान्वीत आहेत. परंतु प्राचीन काळातील शिक्षण प्रणालीत केवळ गुरु व शिष्य यांचाच समावेश होता. त्यामुळे त्यांचाच परस्पर संबंध येत असे, गुरुकूल पद्धतीत मुले अनेक वर्ष कुटूंबापासून दूर रहात असत त्यामुळे त्यांच्या शिक्षणात त्यांच्या पालकांचा सहभाग नसे. परंतु काळानुरुप त्यात बदल होत गेले. काळानुरुप शिक्षण प्रणालीबदलत गेली आणि त्यानुसार

त्यातील व्यक्तिीचे परस्पर संबंधही बदलत गेले.

सद्यास्थितीत पाल्याच्या जडणघडणीत पाल्यांचा सहभाग ही महत्वाचा मानला जात आहे. पालक ही मुलांच्या शिक्षणात सहभाग घेत आहेत. पाल्यांची शैक्षणिक प्रगती ही त्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची बाब आहे. यास्तव पालकांचा अत्यंत जिव्हाळयाचा विषय म्हणजे मुलांचे शिक्षण होय. या कारणास्तव त्यांना सतत शाळेला भेट दयावी लागते. व त्यासाठी पालक सभा ही महत्वाची ठरते यामधुनच त्यांचे शिक्षकांशीही सतत संबंध येत असतो.

शिक्षक व पालक यांना जोडणारा दुवा म्हणजे विद्यार्थी होय. शिक्षक व पालक हे सतत विद्यार्थांचा विकास म्हणजेच प्रगती होण्याच्या दृष्टिने प्रयत्न करीत असतात म्हणूणच शिक्षक व पालक यांच्यातील सहसंबंधाचा परिणाम विद्यार्थ्यांच्या प्रगतीवरच म्हणजे गुणवत्तेवर होत असतो.

आजच्या स्थितीला विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास घडून आणण्याची सर्वस्वी जबाबदारी केवळ शिक्षकांचीच राहीलेली नाही तर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी किंवा प्रगतीसाठी पालकांनाही तेवढेच जबाबदार ठरविले जाते. त्यामुळेच जर शिक्षक व पालक यांचे संबंध चांगले व सलोख्याचे असतील तर त्याचा सकारात्मक परिणाम हा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर दिसून येतो. परंतू हे संबंध प्रस्थपीत करण्यात काही अडचणी येत असतील तर त्या दूर करणे महत्वाचे ठरते व अश्या संबंधाचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होणारा परिणाम अभ्यासणे त्यामुळे महत्वाचे ठरते.

- **संशोधनाची गरज**

विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी शिक्षक विद्यार्थी पालक यांच्यात कश्या प्रकारे सुसंवाद निर्माण करता येईल यासाठी शिक्षक व पालक यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. शिक्षक व पालक संपर्क असेल तर विद्यार्थ्यांतील सुप्त गुणांचा विकास करता येउ शकतो. विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती शैक्षणिक प्रगती व बालकांशी संबंधित इतर आवश्यक माहित पाल्यांना शिक्षकांकडून सहजपणे मिळू शकते.

- **संशोधनाचे महत्व**

संशोधनाचे महत्व खालील विवेचनावरुन स्पष्ट होते.

- माध्यमिक शाळेतील शिक्षक व पालक यांच्यातील संबंधाची सद्यःस्थिती स्पष्ट होईल
- शिक्षक व पालक यांच्यातील संबंधाचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होणारा परिणाम स्पष्ट होईल.
- विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक सुविधांची माहिती शिक्षकांतर्फे पालकांपर्यंत पोहोचविने सोपे होईल.

- विद्यार्थ्यांच्या अनिष्ट वर्तनांची पालकांना शिक्षकांमार्फत वेळीच कल्पना देणे शक्य होईल.
- **समस्या विधान**

  ''जालना शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षक व पालक यांच्यातील संबंधाचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होणारा परिणाम एक अभ्यास.''
- **कार्यात्मक व्याख्या**

1. **माध्यमिक शाळा**

   विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे केंद्र, माध्यमिक स्तरावर शासनाद्वारे आयोजित केलेले आहे. जिल्हयातील प्राथमिक स्तरावरील इयत्ता 5 ते 10 पर्यंतची शाळा होय.
2. **शिक्षक**

   विषयाची तयारी, विद्यार्थ्यांबाबात तळमळ, विद्यार्थ्यांच्या विकासात लक्ष संपन्न व्यक्तिमत्व व शिकविण्याची जिज्ञासा निर्माण करणारा एक सजीव घटक.

   ''विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाचे विन्रमपणे काम करणारा, अध्यापन करणारा मार्गदर्शक व्यक्ति म्हणजे शिक्षक होय.''
3. **पालक**

   ''मुलांना शाळेत पाठविणारा एक जबाबदार व कर्तव्यदक्ष वडील म्हणजे पालक होय''
4. **गुणवत्ता**

   ''सर्वांगीन विकास होतांना जीवन मूल्यांवर आधारित असामान्य झालेला सकारात्मक वर्तन बदल म्हणजे गुणवत्ता होय.''
5. **विद्यार्थी**

   ''ज्ञानासाठी सतत धडपडणारा ज्ञान पिपासू म्हणजे विद्यार्थी होय.''
6. **सहसंबंध**

   विशिष्ट ध्यैयपूर्तीसाठी दोघांत आलेले सकारात्मक संबंध म्हणजे सहसंबंध होय.

- **संशोधनाची उद्दीष्टे**

1. शिक्षक व पालक यांच्यात परस्पर आदरयुक्त नात्यांच्या संबंधाचा अभ्यास करणे.
2. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी यासाठी पालकांचे शिक्षकांना सहकार्य मिळते किंवा नाही याचा अभ्यास करणे.
3. शिक्षक व पालक यांच्यातील संपर्कामुळे शाळेतील गळतीचे प्रमाण कसे रोखता येईल याचा अभ्यास करणे.
4. शिक्षक व पालक यांच्यातील संबंधामुळे मूल्यमापण प्रक्रियेतील तनाव दूर करण्याच्या

प्रक्रियेचा अभ्यास करणे.

- **संशोधनाची गृहितके**

1. शिक्षक व पालक यांच्यातील परस्पर संबंध सलोख्याचे असतात.
2. शिक्षक व पालक यांच्यातील संबंधाचा सकारात्मक परिणाम विद्यार्थी गुणवत्तेवर होतो.
3. पालक विद्यार्थ्यांच्या प्रगतीविषयी जागृत असतात.

- **परिकल्पना**

1. शिक्षक व पालक यांच्यतील संबंध सलोख्याचे असतात.
2. शिक्षक व पालक यांच्या संबंधाचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर कोणताच परिणाम होत नाही.
3. शिक्षक व पालक यांचे संबंध आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेव सार्थक फरक नाही.
4. शिक्षक व पालक यांच्या संबंधाचा विद्यार्थांच्या गुणवत्तेवर नकारात्मक परिणाम होतो.

- **संशोधनाची व्याप्ती**

1. **क्षेत्र व्याप्ती**

   प्रस्तूत संशोधन हे जालना शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षक आणि शाळैतील विद्यार्थी पालक यांच्यातील संबंधाशी संबंधित आहे.

2. **आशय व्याप्ती**

   प्रस्तूत संशोधन हे जालना शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षक आणि शाळैतील विद्यार्थी पालकांच्या संबंधाचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत होणा–या परिणामाशी संबंधित आहे.

3. **कालावधी व्याप्ती**

   प्रस्तूत संशोधन हे 2024 ते 2025 या शैक्षणिक वर्षातील कालावधीशी संबंधित आहे.

4. **नमुना व्याप्ती**

   प्रस्तूत संशोधन हे जालना शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षक आणि शाळैतील विद्यार्थी पालकांच्या संबंधाशी संबंधित आहे.

- **संशोधनाच्या मर्यादा**

1. **क्षेत्र मर्यादा**

   संबंधित संशोधनाची मर्यादा माध्यमिक शाळा, शाळेतील शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.

2. **आशय मर्यादा**

   प्रस्तूत संशोधन हे जालना शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षक आणि शाळैतील विद्यार्थी पालकांच्या संबंधाचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत होणा–या परिणामा पुरतिच मर्यादित

आहे.

3. कालावधी मर्यादा

प्रस्तूत संशोधन हे 2024 ते 2025 या शैक्षणिक वर्षातील कालावधी पुरतेच मर्यादित आहे.

4. नमुना मर्यादा

प्रस्तूत संशोधन हे जालना शहरातील माध्यमिक शाळेतील 10 शिक्षक आणि 10 विद्यार्थी पालकांच्या संबंधा पुरतेच मर्यादित आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तूत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केलेला आहे.

- **जनसंख्या**

प्रस्तूत संशोधनासाठी जालना शहरातील सर्व माध्यमिक शाळा, त्या शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालकांचा समावेश जनसंख्येत केला आहे.

- **नमुना निवड**

प्रस्तूत संशोधनासाठी जालना शहरातील पाच माध्यमिक शाळा व त्या शाळेतील 10 शिक्षक, त्या परिसरातील 10 पालकांची नमुना म्हणूण निवड केली आहे.

- **संशोधनाची साधने**

प्रस्तूत संशोधनाच्या माहिती संकलनासाठी संशोधकाने प्रश्नावली या साधनाचा वापर केला आहे.

- **निष्कर्ष**

प्राप्त प्रश्नावलीच्या आधारे सामुग्रीचे विश्लेषण करण्यात आले व प्रत्येक प्रश्नांचा प्रतिसाद व त्यांचे वर्गीकरण करण्यात आले त्यातील प्राप्त निरिक्षण व अर्थनिर्वचनाावरुन निष्कर्ष काढण्यात आले.

- **विद्यार्थी प्रश्नावलीच्या आधारे निष्कर्ष**

१. 50 टक्के पालक पाल्यांच्या अभ्यासाची चौकशी करतात.

२. 36 टक्के विद्यार्थ्यांची आई त्यांच्या अभ्यासाकडे लक्ष देते.

३. 41 टक्के पाल्याची आई सोबत चांगली आंतरक्रिया होते. तर वडिलांशी त्याप्रमाणात कमी संवाद असतो.

४. 47 टक्के विद्यार्थ्यांच्या घरी अभ्यासाबाबत कडक शिस्तीचे वातावरण आहे तर 33 टक्के

जणांच्या घरी खेळीमेळीचे वातावरण आहे.

५. पालक पाल्यांच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती प्रगतीपुस्तकावर सही करतांना काळजी घेतात. हे प्रमाण 67.74 टक्के आहे. तर शाळेत जाउन चौकशी करणारे पालक 23 टक्के आहेत.

६. शाळेला भेट देणा—या पालकांचे प्रमाण 23 टक्के तर कधी कधी भेट देणा—या पालकांचे प्रमाण 16. 58 टक्के आहे.

७. प्रत्येक महिन्यात भेट देणा—या पालकांचे प्रमाण 12 टक्के तर प्रत्येक सत्रापूर्वी भेट देतात.

८. वेळ मिळाल्यास भेट देणा—या पालकांचे प्रमाण 42 टक्के आहे.

९. 79 टक्के विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांनी शिक्षकांना भेटावे असे वाटते.

१०. 54 टक्के विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांनी शिक्षकांना भेटावे असे वाटते.

११. अभ्यासाशिवाय इतर उपक्रमात सहभागी होण्यास विद्यार्थ्यांचे 5 टक्के पालक प्रोत्याहन देतात. तर 17 टक्के प्रमाण प्रोत्साहन न देणा—या पालकांचे आहे.

१२. 83 टक्के विद्यार्थ्यांचीही इतर उपक्रमात सहभागी होण्याची इच्छा असते.

१३. 75 टक्के पालकांनी विद्यार्थ्यांना अभ्यासासाठीही सोयी उपलब्ध करुन दिल्या आहेत. तर गरजेनुसार सोयी पुरवणा—या पालकांचे प्रमाण 25 टक्के आहे.

१४. विद्यार्थ्यांना येणा—या शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी पालक—शिक्षकांशी संवाद साधण्याचे प्रमाण 48 टक्के तर स्वतः सोडवण्याचा प्रयत्न करणारे पालक ही बरेच आहेत. तर काही पालकांना शिकवणी वर्ग महत्वाचे वाटतात.

१५. 55 टक्के विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांनी—शिक्षकांशी समन्वय साधावा असे वाटते.

१६. 72 टक्के पालक—पाल्य यांचा चांगला संवाद होतो व बहुतांश पालक—पाल्यांना अभ्यासाशिवाय इतर माहिती देण्यासाठी प्रयत्नरत असतात.

- **शिक्षक प्रश्नावलीचे आधारे प्राप्त झालेले निष्कर्ष**

१. पालकांचे अनियमित भेटीचे प्रमाण 5 टक्के आहे.

२. सुशिक्षित पालकांचे भेटीचे प्रमाण 74 टक्के आहे.

३. 50 टक्के पालकांची भाषा जिव्हाळयाची तर 40 टक्के सौजन्यपूर्ण असते. तर क्वचित 10 टक्के पालक आक्रतक भाषेत बोलतात.

४. 78 टक्के पालकांचे शाळेला नियमित भेट देण्याचे शिक्षक—पालक आंतरक्रियेचे प्रमाण अधिक असते. त्यांच्या पाल्याची शैक्षणिक प्रगती चांगली आहे.

५. 74 टक्के पालक शिक्षकांना भेटून गेल्यानंतर 78 टक्के विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत फरक जाणवतो

६. 74 टक्के पलक–शिक्षक आंतरक्रियंचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर अनुकूल परिणाम होतो. विद्यार्थ्यांत असणा–या सुप्त गुणांचा विकास होण्यासही मदत होते.
७. 5 टक्के पालकांत पालक–शिक्षक संपर्काचे महत्व याबदद्ल अज्ञान आहे.
८. 19 टक्के पालकांत पालक–शिक्षक संपर्काचे महत्व याबदद्ल अज्ञान आहे.
६. 74 टक्के पालकांनी केलेल्या सूचनांचे उपयोजन करण्याचा पूर्णपणे प्रयत्न शाळेला केला जातो.

- **पालक प्रश्नावलीच्या आधारे प्राप्त निष्कर्ष**

१. 78 टक्के पालक–पाल्य यांच्या सुसंवाद होतो. अभ्यास तसेव सामाजिक विषयावरही त्यांची आंतरक्रिया होत असे वरील सर्वेक्षणातून दिसून आले.
२. 71 टक्के शाळेत शिक्षकांनी भेटावयास बोलावल्यानंतर त्वरित भेटणारे पालक अल्प आहेत तर वेळेनुसार भेटणा–या पालकांचे प्रमाण अधिक आहे.
३. 88 टक्के शिक्षक–पालक आंतरक्रियेचा मुख्य विषय विद्यार्थ्यांची अभ्यासातील प्रगती असतो, असे सर्वेक्षणावरुन आढळून आले आहे. काही वेळेला दोषाविषयी व पाल्याविषयी व पाल्याच्या सुप्त गुणांविषयी चर्चा होते.
४. शिक्षक–पालक आंतरक्रियेचा विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर परिणाम होतो कारण पाल्याच्या प्रगतीविषयी शिक्षकांशी चर्चा केल्यानंतर पाल्यांच्या प्रगतीत फरक जाणवतो. असे 78 टक्के पालकांचे मत आहे.
५. पालकांना पाल्यांने अभ्यासाशिवाय इतर उपक्रमात सहभाग घ्यावा असे वाटते यासाठी ते स्वतः प्रयत्न करतात. तर केवळ अभ्यासास महत्व देणारे पालक 13 टक्के अत्यल्प आहे.
६. पाल्याचा विकास व्हावा, त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी 50 टक्के पालक स्नेहसंमेलन, बक्षीस वितरण या कार्यक्रमास सहभाग नोंदवतात असे सव्हेक्षणात आढळून आले आहे.
७. पाल्याच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न करणा–या पालकांचे प्रमाण कमी 8 टक्के आहे.
८. पालक शिक्षक संपर्कासाठी पालक सभांचे आयोजन केले जावे असे बहुतांश 95 टक्के पालकांचे मत आहे. असे सर्वेक्षणात दिसून आले. काही पालकांत पालक शिक्षक आंतरक्रियेचे आवश्यक तेवढे महत्व नसल्याचे लक्षात येते तसेच पालकांच्या मते त्यांना संपर्कासाठी विशेष उपक्रम शाळांनी राबवावेत असे वाटते.

- **परिकल्पनेची पडताळणी**

ज्या विद्यार्थ्यांचे पालक शिक्षकांशी आंतरक्रिया करतात. त्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर आंतरक्रियेचा अनुकूल परिणाम होतो. सदर परिकल्पना पडताळण्यासाठी प्रश्नावलीच्या आधारे

माहिती प्राप्त केली व त्या आधारे पुढील बाबी समोर आल्या. सतत लक्ष देणा—या पालकांचे पाल्य व त्यांची प्रगती याबदद्ल माहिती संकलित केली असता असे लक्षात आले की, सतत लक्ष देणा—या पालकांचे प्रमाण कमी आणि त्या पाल्यांची शैक्षणिक प्रगती अतिशय चांगली आहे.

कधी—कधी लक्ष देणा—या पालकांची संख्या 52 टक्के आढळून आली व त्यांच्या पाल्यांची शैक्षणिक प्रगती मध्यम आहे. तर कधीच लक्ष न देणा—या पालकांची प्रगती चिंतनीय आहे. अशा पालकांचे प्रमाण 20 टक्के आहे. यासाठी सर्व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती देण्यासाठी शाळातून त्यांचे प्रथम सत्र, चाचणी परीक्षेचे गुण व शिक्षकांशी अशा विद्यार्थ्यांविषयी माहिती संकलित करुन वरील बाबी दिसून आल्या. हयावरुन असे लक्षात येते की, सतत पालक शिक्ष संपर्क असेल तर त्याच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर अनुकूल परिणाम होतो. सर्व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पालक शिक्षक संपर्कक्षमता वाढविणे अत्यावश्यक आहे. परिकल्पना पूर्णतः स्विकारण्यात आली.

- **परिकल्पना तपासण्यासाठी**

१. सतत लक्ष देणारे पालकांचे पाल्य व त्यांची प्रगती.

२. कधी कमी लक्ष देणारे पाल्य व त्यांची प्रगती.

३. कधीही लक्ष न देणारे पालकांचे पाल्य व त्यांची प्रगती याबाबतचा आलेख खालील प्रमाणे

| अ. क्र. | विद्यार्थी संख्या | प्रगती/संपादन सरासरीमध्ये |
|---|---|---|
| 1. | सतत लक्ष 12 | 77.14 |
| 2. | कधी कधी 33 | 57.18 |
| 3. | कधीही नाही 17 | 42.73 |

- **शिफारशी**
- **पालकांना शिफारशी**

1. पालकांनी घरातील वातावरण, मोकळे, खेळीमेळीचे ठेवावे.
2. पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती घेण्यासाठी प्रत्येक आठवडयात किंवा नियमितपणे शिक्षकांना भेट द्यावी आणि शिक्षक संपर्क वाढवावा.
3. पालकांनी पाल्याकडून प्रथम येण्याची केवळ अपेक्षा न ठेवता त्यांना जाणीवपूर्वक पुरेसा वेळ द्यावा.
4. पालकांनी पाल्याच्या अभ्यासासाठी पुरेशा सोयी उपलब्ध करुन द्याव्यात.
5. पालकांनी पाल्याशी चांगला संवाद ठेवावा. वेळोवेळी मार्गदर्शन करावे.

6. शिक्षकांनी पालकास बोलावल्यास त्वरीत शाळेत भेटण्यासाठी यावे.
7. पालकांनी पाल्याच्या केवळ अभ्यासातील प्रगतीशिवाय इतर सुप्त गुणांचा विकास करण्यासाठी शिक्षकांची आंतरक्रिया करावी.
8. पालकांनी पाल्याच्या सुप्त गुणांचा विकास होण्यासाठी त्यांना अभ्यासाशिवाय इतर आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे मिळणारी माहिती द्यावी. शैक्षणिक प्रदर्शने पाहण्यास घेउन जावे. विविध उपक्रमात सहभागासाठी प्रोत्साहन द्यावे.
9. पालकांनी शिक्षक संपर्कात येणा–या अडचणी दूर करण्यासाठी शिक्षक समन्वय वाढवावा.
10. पालकांनी पाल्याच्या अभ्यासात चांगली प्रगतीसाठी आत्मविश्वास दृढ करण्यात मदत करावी.

- **शिक्षकांना शिफारशी**

1. शिक्षकांनी मुलांच्या प्रगतीचा विचार पालकासमोर मांडावा.
2. शिक्षक–पालक भेटीतील संवाद सुखकारक व सक्रीय असावा.
3. शिक्षकांनी भेटीच्या वेळी मुलांचा फक्त दोषावर भर न देता त्यांच्या चांगल्या बाबी विषयी पालकांशी चर्चा करावी.
4. पाल्याच्या अध्ययन–अध्यापन प्रगतीच्या दृष्टीने पालकांना सहभाग देण्याची विंनती करावी.
5. गरजेनुरुप सर्व पालकांशी संपर्क साधता यावा असे नियोजन करावे.
6. पालकांशी बोलताना स्पस्ट व सौजन्याने बोलावे.
7. मुलांचे छंद, आवडी–निवडी, सवयी त्यांचा परिसर याविषयी पालकांशी बोलून माहिती मिळवावी. प्रत्येक उपक्रमात सहभागी होण्यास प्रोत्याहन द्यावे.
8. शिक्षकांचे प्रभावी अध्यापन मुलांशी प्रेमाने बोलणे आणि आस्थेने मुलाची चौकशी करणे इ. गोष्टिचा पालक संपर्कावर फार मोठा परिणाम होतो. अश्या शिक्षकास पालक न बोलवता देखील भेट देतात.
9. सर्वेक्षणातून लक्षात आले की आईचे मुलांच्या अभ्यासाकडे जास्त लक्ष असते. त्यानुसार शाळांमध्ये माता पालक संघ स्थापन करावी.

वरील सर्व बाबीचे स्मरण ठेवल्यास पालक संपर्क क्षमता नक्कीच वाढेल व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता विकासास उपयोग होईल.

- **पुढील संशोधनासाठी विषय**

1. ''शहरी भागातील व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा गुणात्मक विकास घडविण्यासाठी पालकांचा सहभाग एक सहसंबंध अभ्यास.''
2. ''बी.एड. च्या विद्यार्थ्यींनीचा अभ्यास सवयी आणि त्यांची अभिवृत्ती एक अभ्यास.''

3. ‘‘उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना मराठी विषयाच्या संदर्भात अध्ययन करतांना प्रमान भाषेचा वापर करतांना येणा–या समस्या व त्यावरील उपक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास.’’
4. ‘‘माध्यमिक स्तरावरील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी आणि त्यांचे शैक्षणिक संपादन एक अभ्यास.’’

- **संदर्भग्रंथ सूची**

1. भितांडे, वि.रा. (2006). शैक्षणिक संशोधन पध्दती पूणे : नित्य नूतन प्रकाशन.
2. दांडेकर, वा.ना. (1989). शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र पूणे : विद्या प्रकाशन.
3. दुनाखे, अरविंद. (2006). शैक्षणिक संशोधन पध्दती. पूणे : नित्य नूतन प्रकाशन.
4. जगताप, ह.ना. (2004). प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि माहिती तंत्रविज्ञान. पूणे : नूतन प्रकाशन. कदम,
5. चा.प. चौधरी, वा. आ. (1992). शैक्षणिक मूल्यमापन .पूणे : नूतन प्रकाशन.
6. मुळे, रा.शं. आणि उमाठे, वि.तु. (1998). तिसरी आवृत्ती शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे औरंगाबादः विद्या बुक्स.
7. पंडीत, बं. विं. (2005). शैक्षणिक शिक्षणातील संशोधन; संख्यात्मक आणि गुणात्मक पूणे : नित्य नूतन प्रकाशन
8. सोहोनी, शं.कृ. (1993). शैक्षणिक टीपा कोश .पूणे : शासकीय ग्रंथ निर्मीती मंडळ.